महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

रविवार ❖ १५ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक १७० ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

## सरकारी कर्मचाऱ्यांसाठी
# राज्य सरकारची मोठी घोषणा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर येत आहे. लाडकी बहीण योजनेला मिळालेल्या अभूतपूर्व यशामुळे राज्यातील फडणवीस सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुट्टीसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.. शासकीय कर्मचाऱ्यांना एका वर्षात २४ सुट्ट्या दिल्या जातात.. यानंतर शासनाने आता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना आणखी एक सुट्टी वाढवून दिली जाईल असे म्हटले आहे. याबाबतचे ही शासन परिपत्रक निर्गमित झाले आहे. म्हणजेच २०२५ मध्ये राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना एकूण २५ सुट्ट्या मिळणार आहेत. आपण नवीन वर्षात सरकारी कर्मचाऱ्यांना कोणकोणत्या तारखांना सुट्टी राहणार आणि सुट्टीचे कारण काय या संदर्भात थोडक्यात माहिती पाहणार आहोत.

**जानेवारी ते मार्च २०२५ मधील सुट्ट्या**
प्रजासत्ताक दिन- २६ जानेवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती- १९ फेब्रुवारी २०२५, महाशिवरात्री-२६ फेब्रुवारी,होळी-१४ मार्च,गुढीपाडवा-३० मार्च २०२५, रमझान ईद-३१ मार्च २०२५,

**एप्रिल ते जून २०२५ मधील सुट्ट्या**
रामनवमी- ६ एप्रिल २०२४,महावीर जन्म कल्याणक-१० एप्रिल २०१५, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंची- १४ एप्रिल २०२५, गुड फ्रायडे-१८ एप्रिल २०२५, महाराष्ट्र दिन- १ मे २०२५, बुद्ध पोर्णिमा-१२ मे २०२५ ,बकरी ईद- ७ जून २०२५

**जुलै ते सप्टेंबर २०२५ मधील सुट्ट्या**
मोहरम- ६ जुलै २०२५, स्वातंत्र्य दिन-१५ ऑगस्ट २०२५,पारशी नववर्षी - १५ ऑगस्ट २०२५, गणेश चतुर्थी-२७ ऑगस्ट २०२५ ,ईद-ए-मिलाद-५ सप्टेंबर २०२५

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ मधील सुट्ट्या -** महात्मा गांधी जयंती- २ ऑक्टेबर २०२५ ,दसरा -२ ऑक्टोबर दिवाळी अमावस्या-२१ ऑक्टोबर, दिवाळी- २२ ऑक्टोबर, भाऊबीज - २३ ऑक्टोबर २०२५ ,गुरुनानक जयंती-५ नोव्हेंबर २०२५,ख्रिसमस- २५ डिसेंबर २०२५

# प्रभागस्तरावरील बांधकामांना मंजुरी
## प्रभागस्तरावर दिडशे ते तीनशे मीटरपर्यंतच्या भूखंडावरील बांधकामांना मंजुरी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
शासनाच्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचा आधार घेऊन कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने १५० ते ३०० चौरस मीटर भूखंडावरील इमारतींचे बांधकाम आराखडे पालिकेच्या प्रभागस्तरावर स्वीकारणे आणि मंजूर करण्याचा पथदर्शी प्रस्ताव राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लहान भूखंड विकसित करणे, जुनी बांधकामे नियमित करण्याचा जमीन मालक, विकासकांचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे.



कल्याण डोंबिवली पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या संकल्पनेतून हा पथदर्शी प्रस्ताव नगररचना विभागाचे प्रभारी साहाय्यक संचालक सुरेंद्र टेंगळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत आहे. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नव्या इमारतींचे बांधकाम परवानगीसाठीचे आराखडे नगररचना विभागाकडून मंजूर केले जातात. कल्याण, डोंबिवली ही दोन्ही शहरे यापूर्वी गाव स्वरुपात होती. ग्रामपंचायत, नगरपालिका यांचे प्रशासन येथे होते. त्यावेळची गरज म्हणून नागरिकांनी आपल्या खासगी जमिनीवर कौलारू घरे, चाळींच्या जागी बंगले, इमारती बांधल्या. त्या बांधकामाच्या भूखंडाचे सर्व चटई क्षेत्र निर्देशांक यापूर्वीच मालकांनी वापरले. धोकादायक झालेली ही बांधकामे आता नव्याने उभारणीसाठी विकासक पुढे येत नाहीत. या बांधकामातून आम्हाला वाणिज्य किंवा सदनिकांच्या माध्यमातून वाढीव बांधकाम करणे शक्य होणार नाही, असा विकासकांचा दावा आहे. शहरातील ३५ ते ४० वर्षांपूर्वी बांधलेली आता धोकादायक स्थितीत असलेली बांधकामे नव्याने उभी करण्यासाठी कोणीही विकासक पुढाकार घेत नाही.

अशा बांधकामांच्या परवानगीचे प्रस्ताव प्रभागस्तरावर स्वीकारले, तेथेच साहाय्यक आयुक्तांच्या पुढाकाराने मंजूर झाले तर नागरिकांना स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध होईल. यासाठी नगररचना विभागाने सहकार्य करावे, अशी संकल्पना आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी मांडली. हा प्रस्ताव आता अंमलात येत आहे.

एकत्रित विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावलीमुळे या बांधकामांना आता प्रभागस्तरावर आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून मंजुरी मिळविणे जमीन मालक, बंगले, इमारत मालकांना शक्य होणार आहे, असे नगररचनेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. तसेच, १५० ते ३०० मीटरचे भूखंड जमीन मालकांनी व्यक्तीश किंवा भागीदारी पद्धतीने विकसित करण्याचा निर्णय घेतला. या बांधकामांसाठीची आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली तर प्रभाग स्तरावर या बांधकामाचे आराखडे मंजूर केले जाणार आहेत. या कामासाठी साहाय्यक आयुक्तांना नगररचना विभागातून कनिष्ठ अभियंता, साहाय्यक अभियंता यांचे साहाय्य देण्यात येणार आहे, असे नगररचनेतील एका अधिकाऱ्याने सांगितले.

# आरोग्य यंत्रणेचा संतापजनक कारभार
## शस्त्रक्रियेनंतर ४३ महिलांना कडाक्याच्या थंडीत जमिनीवर झोपवले

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**हिंगोली(प्रतिनिधी) :**
हिंगोलीतील आरोग्य यंत्रणेचा गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. शस्त्रक्रियेनंतर ४३ महिलांना भर थंडीत जमिनीवर झोपवल्या गेले आहे. १३ डिसेंबर रोजी कुटुंब कल्याण योजना शिबिरात महिलांना थंडीच्या काळात थेट जमिनीवर झोपावे लागले.
थंडगार फरशीवर महिलांना झोपण्याची व्यवस्था करण्यात आल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. शस्त्रक्रियेनंतर झोपण्यासाठी रुग्णालयात कॉट उपलब्ध नसल्याने महिलांना जमिनीवर झोपण्याची वेळ आल्याचे बोलले जात आहे. कळमनुरी तालुक्यातील बाळापूर ग्रामीण रुग्णालयात हा प्रकार घडला आहे. याविषयीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आरोग्य यंत्रणेचे चांगलेच धाबे दणाणले आहे. त्यानंतर तात्काळ चूक दुरूस्त करण्याचा प्रयत्न



करण्यात आला. पण या घटनेवर आमदार संतोष बांगर यांच्या भूमिकेने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. नेमकं काय घडलं? काल शुक्रवारी ग्रामीण भागातील महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पण बेड नसल्याने यातील ४३ महिलांना थेट फरशीवर झोपवण्यात आले. ऐन थंडीच्या कडाक्यामध्ये महिलांना फरशीवर झोपावे लागले.

आरोग्य यंत्रणेचा गलथानपणा समोर आला आहे. या सर्व घटनेनंतर नागरिकांनी आरोग्य खात्यावर चांगलाच रोष व्यक्त केला आहे. शस्त्रक्रियेनंतर स्वच्छेतेबाबतही काळजी न घेतल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.पण यंत्रणा हालली नाही. पण जेव्हा याविषयीचे व्हिडीओ समोर आले तेव्हा, त्यावेळी यंत्रणा खडबडून जागी झाली. या बेजबाबदारपणामुळे रुग्णालयावर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. नातेवाईकांच्या डोळयात पाणी.. कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रिया झाल्यानंतर तब्बल ४३ महिलांना जमिनीवरती झोपवण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. आता महिलांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. महिलांच्या नातेवाईकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या असता, त्यावेळी नातेवाईकांना त्यांचे अश्रू लपवता आले नाही. पण यंत्रणेला मात्र सुरुवातीला कसलाच पाझर फुटला नाही. वृत्त समोर आल्यानंतर यंत्रणा खळबळून जागी झाली. यंत्रणेचे धाबे दणाणले,

तात्काळ चुक सुधारली.. बाळापुर घटनेनंतर आरोग्य विभाग खड़बडून जागा झाला आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांसह जिल्ह्याच पथक बाळापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल घडलेल्या घटनेनंतर अधिकचे २० बेड वाढवणार असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक नितिन तडस यांनी दिली आहे. संजय बांगर नेमके काय म्हणाले? आखाडा बाळापूर येथे घडलेला प्रकार धक्कादायक नाही. त्यात आरोग्य विभागाने कोणताही हलगर्जीपणा केला नाही, अशी प्रतिक्रिया आमदार संतोष बांगर यांनी दिली.

## महाराष्ट्र काँग्रेसमध्ये
# मोठया घडामोडींचे संकेत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पक्षश्रेष्ठींना आपल्याला प्रदेशाध्यक्ष पदावरून पदमुक्त करा, अशी मागणी केल्याची माहिती समोर येत आहे.
त्यानंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे नव्या प्रदेशाध्यक्षांसाठी काँग्रेसकडून युवा चेहरा देण्याच्या हालचाल सुरू झाल्या आहेत.



प्रदेशाध्यक्षांसाठी कोल्हापूरचे आमदार सतेज पाटील सांगलीतून विश्वजीत कदम यांचे नाव आघाडीवर आहे. या दोघांपैकी एकाला काँग्रेसचो प्रदेशाध्यक्षपद मिळू शकते अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे. विधानसभा निवडणुकीत १०५ जागा काँग्रेसने लढवल्या. मात्र केवळ १६ जागांवर काँग्रेस विजयी झाले आहे. विधानसभेत झालेल्या लाजिरवाण्या पराभवानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहितआपल्याला पद मुक्त करा अशी मागणी केली.

पटोले यांच्यानंतर काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षवर कोण असणार? याची चर्चा आता काँग्रेसमध्ये चांगलीच रंगली आहे.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला युवा चेहऱ्यांनी तारल्यानंतर प्रदेशाध्यक्षपदावर युवा चेहरा आणणार असल्याची चर्चा आहे. काँग्रेसला उभारी देण्यासाठी दिल्ली हाय कमांडवरून जोरदार हालचाली सुरू आहेत. कोल्हापुरातून आमदार सतेज पाटील यांचे नाव काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदासाठी आघाडीवर आहे.

कोल्हापूरचे जिल्हाध्यक्ष पद स्वीकारल्यानंतर मागील विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात चार आमदार निवडून आणले. तसेच पुणे शिक्षक मतदारसंघातून काँग्रेसचे आमदार निवडून आणले. तर या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांना निवडून आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका घेतली होती. शिवाय निवडणुकीतही उमेदवार निवड समितीमध्ये त्यांची भूमिका राहिली होती. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष पदासाठी त्यांच्या नावाचा विचार होऊ शकतो.आमदार सतेज पाटील यांच्यासोबत सांगलीचे आमदार विश्वजीत कदम यांचे नाव देखील प्रदेशाध्यक्ष पदासाठी आघाडीवर आहे. लोकसभा निवडणुकीत पक्ष उमेदवाराच्या पाठीमागे राहून त्यांना विजयी करण्यापर्यंतची भूमिका कदम यांची होती. राज्यात महायुतीचा करिष्मा चालत असताना लोकसभा निवडणुकीत मात्र काँग्रेसने मैदान मारले असे चित्र या पाटील आणि कदम यांनी करून दाखवले होते. त्यामुळे या दोघांचे नाव सध्या प्रदेशाध्यक्ष पदासाठी चर्चेत आहेत.


# हनुमान मंदिरावरुन राजकारण
## किरीट सोमय्यांचं रेल्वे अधिकाऱ्यांना पत्र



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
दादरच्या ८० वर्षे जुनं हनुमानाचं मंदिर पाडण्यासाठी रेल्वेने नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. या मुद्द्यावरुन ठाकरे गटाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. 'एक है तो सेफ है म्हणतात, पण मंदिरही सेफ नाहीत', अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली आहे. रेल्वे प्रशासनाने दादरच्या हनुमान मंदिराच्या विश्वस्थांना नोटीस पाठवली आहे. नोटीसमध्ये म्हटलंय की, दादर पूर्वेकडील प्लॅटफॉर्म क्रमांक १२च्या बाहेर अनधिकृत मंदिर आहे. ७ दिवसांच्या आत मंदिराच्या विश्वस्थांनी स्वतः पाडावं किंवा रेल्वेकडून पाडण्यात येईल आणि खर्चही वसूल केला जाईल, असं नोटीसमध्ये म्हटल्याची माहिती आहे. खरंतर दादरमधलं हे मंदिर तब्बल ८० वर्षे जुनं असून स्टेशनवर काम करणाऱ्या हमालांनी बांधलंय. विशेष म्हणजे या मंदिराची सार्वजनिक विश्वस्त संस्था म्हणून १९६९ मध्ये धर्मदाय आयुक्त कार्याल यात नोंदणीही झालीय. तरीही रेल्वेने ७ दिवसांचा अल्टिमेटम मंदिराच्या विश्वस्थांना दिलाय. अर्थात मंदिर तुटू देणार नाही, असं भाजपनं म्हटलंय. यानंतर आता भाजप नेते किरीट सोमय्या यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. दरम्यान, हनुमान मंदिर आणि बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचारावर बोट ठेवत उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना टोलाही लगावला आहे. एका फोनमध्ये मोदींनी युक्रेनचं युद्ध थांबवलं. त्यामुळे बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारावर पावलं उचलावी, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत. उद्धव ठाकरे यांनी याबाबत भाष्य केल्यानंतर आता भाजप नेते किरीट सोमय्या यांनी आपली भूमिका मांडली आहे. विशेष म्हणजे सोमय्या यांनी रेल्वे विभागाला तसं पत्र देखील पाठवलं आहे. तसेच 'दादरला हनुमान मंदिर पाडण्याच्या नोटीसीचे पुनरावलोकन करण्याचे आश्वासन रेल्वे अधिकाऱ्यांनी मला दिले आहे. आम्ही ते मागे घेतील असे पाहू. अनेक दशके जुने हनुमान मंदिर पाडता येणार नाही', असं किरीट सोमय्या म्हणाले आहेत.

# वीज पुरवठा खंडित - मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुंबई(प्रतिनिधी) :**
मध्यरेल्वेमार्गावर तांत्रिक बिघाड झाल्याने शनिवारी सकाळी कामावर जाणाऱ्या मुंबईकरांना मनस्ताप सहन करावा लागला आहे. मध्य रेल्वेच्या टिटवाळा रेल्वे स्थानकावर विजपुरवठ्या दरम्यान, तांत्रिक बिघाड झाला. यामुळे अनेक गाड्या या पुढे जाऊ शकल्या नाही. परीमणी मध्य रेल्वेची सेवा विस्कळीत झाली. अनेक गाड्या या जागेवरच उभ्या राहिल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला. या मार्गावरील लोकल या तब्बल १५ ते २० मिनिटे उशिराने धावत होत्या. मिळालेल्या महितीनुसार टिटवाळा व बदलापूर येथे देखील तांत्रिक बिघाड झाल्याने सेंट्रल रेल्वेची अप मार्गावरील वाहतूक ही उशिराने सुरू आहे. वीज पुरवठ्यात तांत्रिक बिघाड झाल्याने कर्जत व कसारा या दोन्ही मार्गावरील रेल्वे सेवा १५ ते २० मिनीटे उशीराने धावत आहे. कसारा मार्गावारून कल्याणला येणाऱ्या रेल्वे मार्गावर टिटवाळा स्थानकावर मोठा तांत्रिक बिघाड झाला आहे. तर कर्जतहून कल्याणला येणाऱ्या रेल्वे मार्गावर बदलापूर येथे तांत्रिक बिघाड




झाला आहे. परिणामी या मार्गावरील लोकल या १५ ते २० मिनिटे उशीराने धावत आहेत. या तांत्रिक बिघाडाचा फटका सकाळी कामावर जाणाऱ्या नागरिकांना बसला आहे. त्यामुळे शनिवारी सकाळी मुंबईकरांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. मध्य रेल्वेचं वेळापत्रक कोलमडलं मध्य रेल्वेचं वेळापत्रक कोलमडलं असून लोकल अर्धा तास उशिराने धावत आहे. बदलापूर ते लोणावळा आणि कल्याण ते इगतपुरी ओव्हर हेड वायरचा विद्युत पुरवठा खंडित झाल्याने लोकल उशीराने धावत असल्याच सांगण्यात येत आहे. विद्युत पुरवठा सुरळीत मात्र त्यामुळे लोकलचं वेळापत्रक कोलमडल आहे. कल्याण ते कसारा आणि कल्याण ते कर्जत रेल्वे वाहतूक २५ ते ३० मिनिटं उशिराने धावत आहे. विद्युत पुरवठ्या मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने दोन्ही मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आहे.

## जाहीर सूचना

दिनांक १४.१२.२०२४ रोजी रात्री ०१.०० वाजता पिसे विद्युत उपकेंद्रातील मुख्य ट्रान्सफॉर्मर क्र १ च्या बी फेज करंट ट्रान्सफॉर्मर मध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे उदंचन केंद्र पिसे येथील एकूण कार्यरत २० पंपांपैकी ६ पंप बंद झाले.
सदर दुरुस्तीचे काम दिनांक १४.१२.२०२४ व १५.१२.२०२४ रोजी हाती घेण्याचे ठरविले आहे. या तातडीच्या दुरुस्ती कामामुळे दिनांक १४.१२.२०२४ ते दिनांक १५.१२.२०२४ या कालावधीत मुंबई व बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे ठाणे व भिवंडी महानगरपालिकेस होणाऱ्या पाणी पुरवठ्यात १५इ कपात करण्यात येणार आहे.तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनास योग्य ते सहकार्य करावे.

# २०२४ मध्ये AI मधील पाच मोठे बदल




आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा संगणकाचा एक टूल आहे, जो इंटेलिजंट मशीन्सच्या विकासावर भर देतो. या इंटेलिजंट मशीन्स मानवांप्रमाणे विचार करतात आणि कार्य करतात. आता एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) प्रत्येक क्षेत्रात आपली छाप सोडत आहे आणि येथून पुढे एआयचा हस्तक्षेप हा आणखी वाढत जाईल.

आता एआयमध्ये जनरेटिव्ह एआय हे नवीन विकसित टूल आलेले आहे. या जनरेटिव्ह एआयचा वापर करून उद्योगांमध्ये ट्रिलियन डॉलर्सचे मूल्य निर्माण करण्याची क्षमता आहे. जगभरातील लोकांनी त्यांच्या वर्कफ्लोमध्ये जनरेटिव्ह **AI** समावेश करण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे **AI** ची लोकप्रियता आणखी वाढत आहे. अशा प्रकारे गेल्या वर्षभरात एआयमध्ये अनेक मोठे बदल दिसून आले. आज आपण एआयमधील पाच महत्त्वाचे बदल जाणून घेणार आहोत.

**निवडक कार्यांमध्ये AI ने माणसाला मागे टाकले**

AI ने इमेज क्लासिफिकेशन, व्हिजुअल रिजनिंग आणि इंग्रजी समज यांसारख्या काही क्षेत्रांत माणसाला मागे टाकले आहे. पण, स्पर्धास्तरीय गणित आणि व्हिज्युअल कॉमनसेन्स रिजनिंग यांसारख्या कठीण बाबतीत एआय अजूनही मागे आहे.

एआय संशोधनावर उद्योग क्षेत्राचा वाटा - आता उद्योग क्षेत्राने AI संशोधनात आघाडी घेतली आहे. २०२३ मध्ये शैक्षणिक क्षेत्रातील १५ मॉडेलच्या तुलनेत २०२४ मध्ये ५१ उल्लेखनीय मशीन लर्निंग मॉडेल्सची निर्मिती केली आहे. यावरून AI इनोव्हेशनमध्ये खाजगी कंपन्यांची महत्त्वाची भूमिका दिसून येते.

**जनरेटिव्ह AI गुंतवणुकीत वाढ**

जनरेटिव्ह **AI** ने गुंतवणुकीत मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे. याला टेक इकोसिस्टमचा पाठिंबा आहे. प्रस्थापित कंपन्या आणि स्टार्टअप्सकडून **AI** च्या क्षमतांमध्ये रुची वाढल्याचे दिसून येत आहे.

सुरक्षित, विश्वासार्ह आणि नैतिक पद्धतीने AI चा वापर जसजसा **AI** चा व्याप वाढत आहे, तसतसा ााच्याबाबतीत चिंता वाढत आहे. संशोधक एआयबाबतीत अधिक पारदर्शकतेवर जोर देऊन **AI** मॉडेल्सच्या सुरक्षिततेचे आणि त्यापासून होणाऱ्या धोक्याचे मूल्यमापन करत आहे.

**AI चा आर्थिक प्रभाव**

AI चा अर्थव्यवस्थेवर लक्षणीय परिणाम होत आहे. एआयमुळे काही संस्थांनी खर्चात कपात केल्याचा अहवाल दिला आहे तसेच **AI** च्या अवलंबामुळे महसूल वाढताना दिसत आहे. एआयसंबंधित जॉब पोस्टिंगमध्येदेखील घट झाली आहे, ज्यामुळे नोकरीच्या विश्वात मोठा बदल दिसून आला आहे.

## मुरबाड विधानसभा मतदारसंघात

# शरदचंद्र पवार पक्षाचे काम पुन्हा जोमाने करणार

### अपयश ही यशाची पहिली पायरी म्हणून सर्वांनी कामाला लागा -सुभाष पवार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड (बाळासाहेब भालेराव)**

गुरुवारी १२ डिसेंबर २०२४ रोजी शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवळे येथे मुरबाड विधानसभा मतदार संघात शरदचंद्र पवार पक्षाचे काम पुन्हा जोमाने सुरू करण्यात येणार आहे तसेच विधानसभा निवडणुकीत अपयश ही यशाची पहिली पायरी म्हणून सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागा असे शुभ संकेत महाविकास आघाडीचे पराभूत उमेदवार सुभाष पवार यांनी शिवळे येथील व्हाईट हाऊसच्या प्रांगणात आयोजित केलेल्या स्नेह मेळावा व कृतज्ञ मेळाव्याच्या कार्यक्रमात केले.

व्यासपीठावर माजी आमदार गोटीरामभाऊ पवार, शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते रामभाऊ दळवी, वसंत गायकर,मुरबाड बाजार समितीचे सभापती बाल कृष्ण चौधरी, खरेदी विक्री संघाचे चेअरमन किसन गिरा, पांडुरंग कोर, मधुकर मोहपे, प्रकाश पवार, बी, एम, पवार, अनिल देसले,महिला संघटक रेखा ईसामे, बाजार समितीचे सर्व संचालक, खरेदी विक्री संघाचे सर्व संचालक, सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, सरपंच, उपसरपंच, यांच्यासह मोठ्या संख्येने वयोवृद्ध नागरिक, तरुण वर्ग, महिला वर्ग उपस्थित होता.

सदर सभेमध्ये सुभाष पवार यांनी बोलताना सांगितले की या मतदारसंघात सर्वांनी मनापासून चांगले काम केले त्यामुळे आपल्याला या संपूर्ण मतदारसंघात सव्वा लाखाचे मतदान आपण घेऊ शकलो तसेच काही गावांमध्ये तसेच वाड्या-पाड्यांमध्ये कोणी काम केला नाही,, कोण काम करत नव्हता हे काढण्यापेक्षा पुढे आपण शरद चंद्र पवार पक्षाचे काम जोमाने सुरू करून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये आपण आपली ताकद दाखवून देऊया जरी आपला या मतदारसंघात पराभव झाला असला तरी आज आपण सर्वत्र महाराष्ट्कारात बघतो की ईव्हिएम मशीनमध्ये मोठी गडबड झाली आहे. ही शंका मलाही वाटत आहे पण लवकरात -लवकर सुप्रीम कोर्टात महाविकास आघाडीचे नेते जाणार आहेत त्याचा निर्णय काय लागणार त्यापेक्षा आपण आत्तापासूनच या मतदारसंघात कामाला लागा सर्वांना बरोबर घेऊन मी तुमच्या सोबत आहे वेळ प्रसंग मला कधी फोन करा मी तुम्हाला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही कारण या मतदारसघात तुम्ही माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांच्या विश्वास ठेवून तुम्ही काम केले आहे त्याची मला आणि पवार यांना यांना जाण आहे त्यामुळे तुम्ही पुन्हा एकदा नखचता कामाला लागा अशा प्रकारच्या सूचना सुभाष पवार यांनी या मतदारांच्या आभार व्यक्त करताना सांगितले की ज्यांनी ज्यांनी मनापासून आपले काम केले, सहकार्य केले त्यांना मी धन्यवाद देतो.

निवडणुकीमध्ये ईव्हीएम घोटाळा झाला की काय अशीही शंका येते असाही सूर अनेकांच्या भाषणातून निघाला एकंदरीत सर्वच मतदारसंघातील मतदारांचे जाहीर आभार मानण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे ,सभेचे, प्रास्ताविक प्रकाश पवार यांनी केले तसेच सूत्रसंचालन शिवाजी घोलप यांनी केले

# किल्ले पद्मदुर्गावर संवर्धन मोहीम राबविली




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**वासिंद(प्रतिनिधी)**

शिवस्मरण प्रतिष्ठान अंबाडी या प्रतिष्ठापनच्या वतीने मुरूड येथील ऐतिहासिक किल्ले पद्मदुर्गावर गड संवर्धन मोहीम राबविण्यात आली.

गेल्या नऊ वर्षांपासून या प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध किल्ले व गडांवर संवर्धन मोहीम राबविण्यात येत आहे. नुकतीच ऐतिहासिक किल्ले पद्मदुर्गा गडावरील तटबंदी, बुरुज इत्यादी वास्तूवरील अनावश्यक असलेले गवत, झाड, वेली काढून संवर्धन व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शना खाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत १३ सदस्यांनी सहभाग घेतला होता. तर अशाच प्रकारे येणाऱ्या काळात पद्मदुर्ग किल्ल्याला अजून जास्त प्रकाश झोतात आणण्यासाठी व संवर्धनासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी म्हटले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे सचिव अरुण जामदार यांनी दिली.

## ज्ञानसी फाउंडेशनच्या अध्यक्षा

# साधना बुगले यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**वासिंद(प्रतिनिधी)**

ज्ञान शी फाउंडेशनचे अध्यक्षा साधना बुगले यांचा वाढदिवस प्रचंड गर्दी संपन्न झाला.



यावेळी साधना ताईच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे त्यांच्या जनसंपर्कप्रमुख शुभांगी पाटील योगिता पंड्या, करिष्मा पाटील, यांनी विशेष परिश्रम घेतले.

शुभेच्छा देण्यासाठी नामवंत समाजसेवक महेश जाधव, अनिल भंडारी, जेष्ठ पत्रकार शिवचरित्र व्याख्याते शांताराम तांगडकर, बँकेचे मॅनेजर हार्दिक ठक्कर, मॅनेजर रसिका ठाकूर, मानस रोग तज्ञ रेखा सिंग, सर्वश्री भास्कर बुगले, चैतन्य बुगले सह मान्यवरांनी शुभेच्छा देण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती प्रथम केक कापण्यात आला व मान्यवरांनी शुभेच्छा पर विचार व्यक्त केले.

# बंदुकीची गोळी पायाला लागल्याने महिला पोलिस कर्मचारी जखमी

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस स्टेशन मधील महिला कर्मचारी बंदूक साफ करताना अचानक गोळी सुटल्याने जखमी झाली आहे. पोलीस स्टेशन मध्ये बंदूक साफ करत असताना पायाला गोळी लागल्याने नूतन लाड ह्या जखमी झाल्या. त्यांना उपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय पेण येथे दाखल करण्यात आले आहे.

सविस्तर घटना अशी की, दादर सागरी पोलीस स्टेशन मधील महिला पोलीस कर्मचारी नूतन रामचंद्र लाड ह्या पोलीस स्टेशन मध्येच बंदूक साफ (सर्व्हिसिंग) करत असताना अचानक बंदुकीची गोळी सुटली. सदर गोळी ही नूतन लाड यांच्या पायाला घासून गेल्याने त्या जखमी झाल्या. त्यांना लगेच पेण येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र नंतर त्यांना अधिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. सदर घटना घडल्याचे समजताच पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे, दादर सागरी प्रभारी अधिकारी नागेश कदम आदींनी तात्काळ भेट दिली.

# खालापूर केंद्रातील क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा उत्साहात संपन्न



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

केंद्रप्रमुख हेमंत म्हात्रे यांच्या मार्गदर्शना खाली १० व ११ डिसेंबर या कालावधीत क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा कांढरोली व कलोते मोकाशी शाळा मुख्याध्यापक, जयश्री सुर्वे दिपक पालकर यांनी कार्यक्रमाचे यजमान पद भूषविले तसेच स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडल्या एकूण १७ शाळा या मध्ये सहभागी झाल्या होत्या.विविध स्पर्धांचा भरपूर आनंद विद्यार्थ्यांनी लुटला.

मुलांच्यामध्ये उत्साह आणि खेळामध्ये चुरस पाहण्यास मिळाली. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते सन्मा. हनुमंत पिंगळे ग्रूप ग्रामपंचायत कलोते मोकाशी यांनी खूप सहकार्य केले. त्याचप्रमाणे माजी उपसभापती निवृत्ती पिंगळे यांचेही कार्यक्रमास मोलाचे मार्गदर्शन लाभले त्याचबरोबर केंद्रातील सर्वच शिक्षकवृंद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता खूप मेहनत व सहकार्य केले

# नवी मुंबई विमानतळाची धावपट्टी सज्ज

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर वैमानिकांना विमान उतरविण्यावेळी धावपट्टीचा अचूक अंदाज मिळण्यासाठी धावपट्टीवरील दिव्यांच्या मार्गाची अचूक सूचना देणाऱ्या यंत्रणेची चाचणी एका लहान विमानाच्या साह्याने गुरुवारी सकाळी साडेआठ वाजता घेण्यात आली.

ही चाचणी यशस्वी झाल्याची माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्राधिकरणाने (एनएमआयए) गुरुवारी सायंकाळी त्यांच्या समाजमाध्यमांवरील संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. ही चाचणी यशस्वी झाल्याने विमानतळाच्या दक्षिण धावपट्टीवर लवकरच मोठे विमान उतरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## ऑस्ट्रेलियातील आंतरराष्ट्रीय 'आयर्न मॅन' स्पर्धेत


# वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांची अभूतपूर्व कामगिरी

### सलग १७ तासांत ३.८ किमी जलतरण, १८० किमी सायकलिंग आणि ४२.२ किमी मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण केली

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**उल्हासनगर(प्रतिनिधी)**

उल्हासनगर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले विष्णू नाथा ताम्हाणे यांनी आंतरराष्ट्रीय 'आयर्न मॅन' स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करून महाराष्ट्र पोलीस दलाचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे. वेस्टर्न ऑस्ट्रेलियातील बस्लटन येथे आयोजित या स्पर्धेत विष्णू ताम्हाणे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह सहभाग घेत जगभरातून आलेल्या १७०० स्पर्धकांमध्ये आपले स्थान निर्माण केले.

ऑस्ट्रेलियातील 'आयर्न मॅन' स्पर्धा म्हणजे केवळ एक शारीरिक चाचणी नसून ती मानसिक खंबीरतेचा आणि जिद्दीचा सर्वोत्तम नमुना मानली जाते. विष्णू ताम्हाणे यांनी ३.८ किमी जलतरण, १८० किमी सायकलिंग, आणि ४२.२ किमी मॅरेथॉन धावणे अशा कठीण टप्प्यांतून मार्गक्रमण करत सलग १७ तासांच्या आत ही स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली. 'आयर्न मॅन' स्पर्धेत जगभरातून १७०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी केवळ ११०० स्पर्धकांनी ही स्पर्धा पूर्ण केली. महाराष्ट्रातील पोलीस दलातील अधिकाऱ्यांसह विष्णू ताम्हाणे, विजय अनपट आणि संदीप पाचपुते यांनी या आव्हानात्मक स्पर्धेत भाग घेतला. ताम्हाणे यांच्या सोबत त्यांचा १८ वर्षीय मुलगा गौरंग ताम्हाणे यांनीही या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता, मात्र प्रतिकूल हवामानामुळे त्यांना स्पर्धा अर्धवट सोडावी लागली.



विष्णू ताम्हाणे यांना स्विमिंग, सायकलिंग आणि रनिंगसाठी तज्ज्ञ प्रशिक्षकांचा मार्गदर्शन लाभले. स्विमिंगसाठी संजीवन वालावलकर, सायकलिंग आणि धावण्यासाठी चैतन्य वेल्हाळ, तर स्ट्रेंथ ट्रेनिंगसाठी विजय गायकवाड यांनी त्यांना तयार केले. त्याशिवाय त्यांच्या कुटुंबीयांचा आणि पोलीस दलातील सहकाऱ्यांचा मोलाचा पाठिंबा मिळाला. विष्णू ताम्हाणे यांना सातत्याने प्रोत्साहन देणारे आणि स्पर्धेसाठी परवानगी देणारे ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त सचिन गोरे आणि त्यांचे सहकारी यांचे योगदानही या यशामागे महत्त्वाचे ठरले.

'आयर्न मॅन स्पर्धा पूर्ण करणे हे केवळ माझ्या वैयक्तिक क्षमतेचे यश नाही, तर माझ्या सहकाऱ्यांचे प्रोत्साहन, कुटुंबीयांचा पाठिंबा आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन यांचे फलित आहे. या स्पर्धेतून मला हे शिकायला मिळाले की धैर्य, संयम, शिस्त आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणतेही अशक्य वाटणारे ध्येय गाठता येते. आयर्न मॅन स्पर्धेचे ब्रीदवाक्य 'एव्हरीथिंग इज पॉसिबल' हे प्रत्येकाला सांगते की वय, परिस्थिती किंवा आव्हाने यांना बाजूला ठेवून आपण आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवला पाहिजे. या यशातून माझे पोलीस दलातील सहकारी, समाजातील तरुण, आणि मुलांना नवी प्रेरणा मिळेल, अशी माझी आशा आहे. पोलीस दलाच्या तंदुरुस्तीविषयीची भावना अजून बळकट होण्यासाठी अशा स्पर्धा उपयुक्त ठरतील, याचा मला विश्वास आहे.'

**- विष्णू ताम्हाणे(वरिष्ठ पोलीस निरीक्षक)**

'आयर्न मॅन' स्पर्धेत अनेक शारीरिक आणि मानसिक आव्हानांचा सामना करावा लागतो. थंडी, वारा, पाऊस अशा प्रतिकूल हवामानातही स्पर्धक आपली कामगिरी बजावतात. स्पर्धेचे ब्रीदवाक्य 'Everything is Possible' या प्रेरणेने विष्णू ताम्हाणे यांनी आपल्या ५६ व्या वर्षी हे धाडस दाखवले. ताम्हाणे म्हणाले, 'ही कामगिरी माझ्यासाठी वैयक्तिक अभिमानाची बाब असून, माझ्या पोलीस दलातील सहकाऱ्यांच्या आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्यामुळे शक्य झाली आहे. हे यश पोलीस दलासाठीही प्रेरणादायी आहे.'

पुण्यात कार्यरत असताना विष्णू ताम्हाणे यांनी पोलीस दलात मॅरेथॉन आणि सायकल पेट्रोलिंगसारख्या अभिनव उपक्रमांचा प्रारंभ केला होता. या उपक्रमांनी पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना तंदुरुस्तीबाबत जागरूक केले. आयर्न मॅन स्पर्धेतील त्यांची कामगिरी ही नव्या पिढीच्या पोलीस अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. ताम्हाणे यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची ही कामगिरी संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. पोलीस दलातील इतर कर्मचारी आणि नागरीकांमध्ये शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीबाबत जागृती निर्माण करण्याचे त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल.




**१५ डिसेंबर २०२४**
**रविवार**

**मेष**
व्यवसायात कोणाकडून लाभ मिळण्याची आशा वाढेल. भाऊ-बहिणींचे सहकार्य मिळेल. दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. तुमचे काम सुरळीतपणे करत राहा.

**वृषभ**
तुमची दिनचर्या आज चांगली राहील. आज तुमच्या आत सकारात्मकता राहील, त्यामुळे तुमचे मन कामात व्यस्त राहील. तुमच्या भौतिक सुखसोयी वाढतील.

**मिथुन**
काही महत्त्वाचे निर्णयही घेऊ शकाल. कुटुंबातील सदस्यांसोबत अधिकाधिक वेळ घालवण्याची संधी मिळेल.तुमचे मन प्रसन्न राहील.

**कर्क**
तुमच्या मुलांच्या हालचालींवरही बारीक लक्ष ठेवा. वेळीच योग्य ती पावले उचलल्यास परिस्थिती नियंत्रणात येईल. जास्त कामाचा ताण पडणार नाही.

**सिंह**
ऑनलाइन व्यवसाय करणाऱ्या महिलांचे उत्पन्न वाढेल. गरजूंना मदत करण्यासाठी पुढे याल. कामाशी संबंधित आव्हानाचा सामना करावा लागेल आणि यशस्वीही व्हाल.

**कन्या**
कामासाठी प्रवासाचा कार्यक्रम बनवता येईल. जवळचे नातेवाईक घरी येतील आणि घरात सकारात्मक ऊर्जा येईल. मोठ्यांचा स्नेह आणि आशीर्वाद अवश्य घ्या.

**तूळ**
दिवस लाभदायक असेल. समाजसेवा करणाऱ्या व्यक्तींचा आज स्थानिक लोकांकडून सन्मान केला जाईल, त्यामुळे त्यांचे मनोबल उंचावेल.

**वृश्चिक**
कामाच्या ठिकाणी व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये सुधारणा होईल आणि सहकारी आणि कर्मचारी यांच्याशी जुने मतभेद दूर होतील.

**धनु**
मान-सन्मान राखा. आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र जाणार आहे. आपण काम आणि कौटुंबिक संबंधांमध्ये सुसंवाद राखू.

**मकर**
तुम्हाला मित्रांकडून पूर्ण मदत मिळेल. विशेष कामांबाबतही चर्चा होईल. काम करण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला घेणेही तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**कुंभ**
आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज, व्यस्त असूनही, तुम्ही कुटुंबात योग्य सौहार्द राखाल. तुम्ही स्वतःला मजबूत ठेवाल.

**मीन**
आपण काही काम पूर्ण करण्यासाठी नवीन मार्गांचा विचार करू. व्यवसाय करणारे लोक व्यवसायाला पुढे नेण्यात यशस्वी होतील.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
– E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

# शिक्षणमहर्षी शिवाजीराव जोंधळे यांची संपत्ती हडपण्यासाठी खोट्या मृत्यूपत्राचा आधार!



## पत्नी, मुले, वकील, डॉक्टरसह ६ जणांवर गुन्हा दाखल

### मुंबईचे आझाद मैदान पोलीस ॲक्शन मोडवर

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता खर्डी(प्रतिनिधी) :** संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षणमहर्षी म्हणून नावाजलेले कै शिवाजीराव जोंधळे यांच्या मृत्यू नंतर त्यांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तांवर ताबा मिळवण्यासाठी खोटे मृत्युपत्र तयार करून मालमत्ता हडप करण्याचे षडयंत्र उघड झाले आहे. मुंबई येथील आझाद मैदान पोलीस ठाण्यात शिवाजीराव जोंधळे यांची पत्नी, त्यांची दोन मुले, खोटे मृत्युपत्र बनवणारे वकील, फिटनेस सर्टिफिकेट देणारे डॉक्टर , साक्षीदार यांच्यावर गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

शिवाजीराव जोंधळे यांची मुलगी वर्षा प्रीतम देशमुख तथा वर्षा शिवाजीराव जोंधळे या आसनगाव येथील विघ्नहर्ता ट्रस्ट च्या अध्यक्ष असून त्यांच्या माध्यमातून आसनगाव कॉलेजमध्ये हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गुरुवारी संध्याकाळी आसनगाव येथे त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही धक्कादायक बाब उघड केली. वर्षा ही शिवाजीराव जोंधळे यांच्या दुसऱ्या पत्नीची मुलगी असल्याचे सांगत त्या कायदेशीर वारस असल्याचे मुंबई सिटी सिव्हिल कोर्ट च्या सूट नंबर ६१४/२०२२ चा आदेश दाखवीत संपूर्ण घटनाक्रम सांगितलं. यामध्ये त्यांनी शिवाजीराव जोंधळे यांचा मृत्यू दिनांक १९ एप्रिल २०२४ ला झाल्यानंतर त्यांच्या पहिल्या पत्नी, त्यांची दोन मुले यांनी त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी जबरदस्ती करित दमदाटी करण्यास सुरवात केली. त्यावेळेस अनेक शेतजमीनींचे शिवाजीराव यांच्या नावे असलेल्या शेतजमिनी नावावर करण्यासाठी एका मृत्यूपत्राच्या आधारे वारस लावण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यावेळेस वर्षा यांनी असे कुठलेही मृत्यूपत्र वडिलांनी तयार करून ठेवल्याचे त्यांना सांगितलेले नसल्याने त्यांना हे मृत्यूपत्र बोगस असल्याचा संशय आल्याने त्यांनी त्याबाबत खात्री करण्यास सुरवात केली. दिनांक १३ मार्च २०२४ ला हे नोंदणीकृत मृत्यूपत्र नॉटरी केल्याचे लक्षात आले मात्र त्यावर असलेली सही ही खोटी असल्याचे देखील वर्षा यांच्या लक्षात आले. तसेच वडिलांचा १३ मार्च चा मोबाईल लोकेशनचा डेटा मागवलं असता शिवाजीराव जोंधळे हे १३ मार्च रोजी मुबंई फोर्ट परिसरात गेले असल्याचे निदर्शनास आले नाही.

तदनंतर वर्षा देशमुख यांनी ३१ ऑक्टोबरला मुंबई येथील आझाद मैदान पोलीस ठाण्यात वडिलांचे खोटं मृत्यूपत्र बनवून त्यांची मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न सुरु असल्याबाबतची तक्रार पोलिसांना दिली. आझाद मैदान पोलिसांनी सदरचा मृत्यूपत्र, नॉटरी वकील, फिटनेस सर्टिफिकेट देणारे डॉक्टर, वर्षा जोंधळे यांची सावत्र आई, २ सावत्र भाऊ, २ साक्षीदार यांची चौकशी केली असता पोलिसांना देखील हे मृत्यूपत्र खोटं असल्याचे निदर्शनास आल्याने आझाद मैदान पोलिसांनी ९ डिसेंबर रोजी बनावट मृत्यूपत्र बनवून शिवाजीराव जोंधळे यांची संपत्ती हडपण्याचा प्रयत्न करणारे म्हणून संशयीत त्यांची पहिली पत्नी वैशाली जोंधळे, मुलगे सागर जोंधळे, देवेंद्र जोंधळे, ॲड निलेश मांडवकर, नोटरी वकील टी. सी. कौशिक, फिटनेस सर्टिफिकेट देणारे डॉक्टर अरुण भुते, मृत्यूपत्राचे साक्षीदार किशोर जोंधळे, चैतन्य बडवर यांच्यावर आझाद मैदान पोलीस ठाण्यात भा द वि ४२० , ४६५ , ४६७ , ४६८, ४७१ ,१२० ब नुसार गुन्हा दाखल केला आहे.



तेथे कर माझे जुळती

# सरदार वल्लभभाई पटेल

## ( ३१ ऑक्टोबर १८७५ - १५ डिसेंबर १९५० )

सर्वांत प्रतिष्ठित व प्रमुख नेते , भारताचे पोलादी पुरुष , उपपंतप्रधान व गृहमंत्री म्हणून मोठे योगदान असलेल्या मुत्सद्दी राजकारणी व अद्वितीय व्यक्ती म्हणून ज्यांचा नावलौकिक आहे अशा नेत्याचा परिचय करून घेणे ही काळाची गरज आहे .


वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरातच्या नडियाद जवळ असलेल्या खेडा गावी एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव झवेरभाई पटेल व आईचे नाव लाडबा पटेल असे होते . त्यांनी बॅरिस्टर ही पदवी मिळविली . ते उत्तम वकिल होते. पुढे नागपूर , प्रयाग, उस्मानिया यांसारख्या विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट ही पदवी बहाल केली होती . सुरुवातीला लोकमान्य टिळक व नंतर महात्मा गांधी यांच्या प्रभावामुळे ते स्वातंत्र्य लढ्यात ओढले गेले इ.स . १९१७ -१८ सालातील खेडा सत्याग्रह १९२३ सालचे बोल सर व झेंडा सत्याग्रह आणि १९३०चा मिठाचा सत्याग्रह यांत त्यांनी हिरिरीने सहभाग घेतला. उत्तम प्रशासक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. सोमनाथच्या देवळात अस्पृश्यांना प्रवेश व पूजा करण्याचा हक्कही त्यांनी मिळवून दिला होता. शांतपणे व सामंजस्याने प्रश्नांवर तोडगे काढण्याकडे त्यांचा कल असे आणि त्यात ते यशस्वीही होत. अनेक चळवळींचे त्यांनी नेतृत्व केले.

बार्डोलीच्या कर बंदीच्या चळवळी नंतर लगेच १९३८ च्या कायदेभंगाच्या चळवळीत व वैयक्तिक सत्याग्रहात आणि १९४२च्या छोडो भारत आंदोलनात नेतृत्व केल्याबद्दल ब्रिटीशांनी त्यांना तुरुंगात टाकले होते . साडेपाचशे संस्थानं भारतात विलीन करून देश एकसंघ बनवला. अपवाद होता फक्त हैदराबाद, जुनागढ व काश्मिरचा वल वल्लभभाई पटेलांनी संस्थानिकांच मन वळवण्यासाठी दुधारी शस्थाचा र शस्त्रा चा वापर खुबीने केला.

हैदरबाद च्या निजामावर तर पोलीस कारवाई करावी लागली गृहमंत्री या नात्याने त्यांनी केलेल्या कामगिरीचा हा सर्वोच्च बिंदू होता . पुढे जुनागढ व काश्मिर ही संस्थाने देखील त्यांच्याच कर्तबगारीमुळे भारतीय संघराज्यात विलीन होऊ शकली आणि भारत हा ' देश ' म्हणून डौलाने मिरू लागला.

वल्लभभाई पटेल हे शेतकऱ्यांचे कैवारी होते . शेतसारा सरकारला कोणीही भरायचा नाही असे त्यांनी फर्मान काढले होते . आणि सरकारला माघार घेण्यास भाग पाडले म्हणून जनतेने त्यांना 'सरदार ' ही पदवी दिली. देशाला स्वातंत्र्य मिळाले नंतर पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान झाले. स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान ही पदे त्यांना देण्यात आली १९४७ ते १९५० पर्यंत त्यांनी ही पदे भूषविली. विशेष म्हणजे १८२ मीटर उंचीचा पुतळा सुप्रसिद्ध ' स्टॅच्यू ऑफ युनिटी ' हा जगातील सर्वात उंच पुतळा म्हणून ओळखला जातो .

भारतमातेची सेवा करता करता ह्या नेत्याने दिनांक १ ५ डिसेंबर १९५० रोजी देह ठेवला. देशासाठीच जीवन समर्पित करणाऱ्या चाणाक्ष बुद्धीच्या दूरदर्शी देशप्रिय तसेच विलक्षण आकलन असलेल्या आदरणीय राजकारणी नेत्यास सादर प्रणाम!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# खर्डीतील जीवनदीप महाविद्यालयाला नॅक 'बी' ग्रेड प्राप्त

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता खर्डी(प्रतिनिधी) :** जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी ता शहापूर जि ठाणे येथे दिनांक ४ व ५ डिसेंबर रोजी महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकनाकरिता डॉ व्ही. दुर्गा भवानी ( तिरूपती) , डॉ.एस वसंथा ( चेन्नई) ., डॉ हारेन साकिया ( आसाम) यांच्या त्रिसदस्यीय समितीने भेट देऊन मागील पाच वर्षांच्या कामकाजाचा आढावा सात घटकांच्या आधारे घेतला.





त्याच बरोबर विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, संस्था प्रतिनिधी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यात महाविद्यालयाने पहिल्याच प्रयत्नात बी ग्रेड प्राप्त केला.यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. या महाविद्यालयाची स्थापना २००८ साली जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून श्री रविंद्र घोडविंदे सर यांनी केली होती. खर्डी सारख्या आदिवासी बहुल व दुर्गम भागात ज्ञानदानाचे कार्य महाविद्यालययाच्या माध्यमातून केले जाते. महाविद्यालय हे विनाअनुदानित असून गुणवत्तेशी कुठल्याही प्रकारची तडजोड केली जात नाही. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.रविंद्र घोडविंदे, सौ.स्मिता घोडविंदे , श्री. प्रशांत घोडविंदे, श्री.अनिल घोडविंदे,प्र.प्राचार्य कैलास कळकटे यांनी महाविद्यालाचे अभिनंदन केले. प्रा विशाल भोसले यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. तर सगळ्याच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या प्रक्रियेसाठी अतिशय परिश्रम घेतले.

# केडीएमसीच्या टिटवाळ्यातील प्रसूतीगृहात महिला रुग्णास रुग्णवाहिका मिळण्यास तीन तासाची प्रतिक्षा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली मनपाच्या रुग्णालयातील गलथान कारभार चा फटका बसल्याचा प्रकार समोर आला आहे. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या टिटवाळा येथील रुक्मीणी प्लाझा या प्रसूती गृहात एका महिलेची प्रसूती झाल्यावर तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी मुंबईला हलविण्याकरीता रुग्णवाहिका हवी होती. रुग्णवाहिका तीन तासाच्या प्रतिक्षेनंतर उपलब्ध झाल. याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याने तीव्र संताप व्यक्त करीत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

टिटवाळा येथील प्रसूतीगृहात प्रसूतीसाठी वैदेही मुंडे दाखल झाल्या होत्या. त्यांची प्रसूती झाली. त्यांनी एका बाळाला जन्म दिला. त्यांच्या बाळाची प्रकृती ठिक नसल्याने बाळाला उपचारासाठी महा पालिकेच्या डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र बाळाची आई वैदेही यांचीही प्रकृती ठिक नसल्याने तिला मुंबईतील रुग्णालयात हलविणे गरजेचे होते. त्यासाठी रुग्णाहिका नव्हती. त्यामुळे तिला तीन तासानंतर रुग्णवाहिका उपलब्ध झाली. त्याचबरोबर याच रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या चैताली भंडारे यांची प्रसूती करण्यात डॉक्टरांनी विलंब केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यांना डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करुन प्रसूतीचा सल्ला दिला होता. त्या त्यासाठी तयार नसल्याने प्रसूती उशिराने शस्त्रक्रियेद्वारेच करण्यात आल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

हा प्रकार कळताच शिवसेना शिंदे गटाचे उपशहर प्रमुख विजय देशेकर यांनी महापालिकेच्या आरोग्य सेवेचच्या गलथान कारभारामुळे रुग्णवाहिका तीन तासानंतर उपलब्ध झाली. त्या महिलेच्या जिवाला दगाफटका होऊ शकला असता. महापालिकेने आरोग्य सेवा वेळीच सुधारली नाही तर आंदोलन करण्याचा इशारा देशेकर यांनी यानिमित्ताने महा पालिका प्रशासनाला दिला आहे.

'या संदर्भात उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी प्रसिद्धी माध्यामांना सांगितले कि, मनपाकडून रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला. मात्र महिलेला मुंबईतील रुग्णालयात पाठविले आहे. त्याचबरोबर अन्य एका महिलेची प्रसूती देखील करण्यात आली आहे.

महापालिकेकडे सध्या १४ रुग्णवाहिका आहे. त्यापैकी एक रुग्णवाहिका नादुरुस्त आहे. आणखीन ९ रुग्णवाहिका खरेदी करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. लवकर ९ रुग्णवाहिका दाखल होती. त्यामुळे रुग्णवाहिकांची एकूण संख्या २३ इतकी होईल असे सांगितले.'

# संगीतप्रेमींसाठी एक खास संध्याकाळ

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :** वैशाली माडे फाऊंडेशन प्रस्तुत 'नाईन्टीज पहला नशा' हा गाण्यांचा अनोखा कॉन्सर्ट संगीत प्रेमींसाठी एक अविस्मरणीय संध्याकाळ साजरी करण्यासाठी, वैशाली माडे फाऊंडेशन प्रस्तुत 'नाईन्टीज पहला नशाः द एरा ऑफ लव्ह अँड रिदम' या विशेष मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २० डिसेंबर २०२४ रोजी, रात्री ८:३० वाजता ठाण्याच्या डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात सादर होणार आहे. यावेळी वैशाली माडे आणि अन्य गायक ९०च्या दशकातील सुरेल गाणी सादर करणार असून सरत्या वर्षात संगीतप्रेमींना एक अनोखा नजराणा अनुभवायला मिळणार आहे.




वैशाली माडे, ज्यांनी आपल्या मोहक आवाजाने लाखो श्रोत्यांची मने जिंकली आहेत. त्यांचा आवाज केवळ मराठीच नाही, तर हिंदी चित्रपटसृष्टीत देखील गाजला आहे. या कार्यक्रमात वैशाली माडे यांच्यासोबत सहगायक म्हणून मनीषा जांबोटकर आणि प्रेमकुमार यांचा सहभाग असेल, ज्यामुळे ही संगीत मैफल अधिकच रंगतदार ठरेल. तसेच संगीत संयोजनाची धुरा प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अविनाश चंद्रचूड यांनी सांभाळली आहे. या मैफलीचे मुख्य आकर्षण म्हणजे ३५ वादकांच्या भव्य ऑर्केस्ट्राचा समावेश. तसेच सुप्रसिद्ध गायिका साधना सरगम यांच्या उपस्थितीने या मैफलीला चारचांद लागणार आहेत. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन शिरीष पवार, अनुसया आर्ट्स प्रॉडक्शन्सने केले आहे.

वैशाली माडे म्हणतात, ''पहला नशा' हा केवळ एक संगीत कार्यक्रम नाही, तर ९०च्या दशकातील प्रेम, आनंद आणि मैत्रीच्या आठवणींना उजाळा देणारा एक जादुई अनुभव आहे. त्या काळातील गाणी आपल्या भावनांना अनोख्या भाषेत व्यक्त करायचे आणि ती आजही आपल्या हृदयात जिवंत आहेत. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू हा आहे की, यातून जमा होणारी रक्कम आम्ही काही सामाजिक संस्थांना मदत म्हणून देणार आहोत. या फाऊंडेशची ही सुरूवात असून यापुढे असे अनेक कार्यक्रम करून त्यातून मिळणारी रक्कम सामाजिक संस्थांना देण्याचा आमचा मानस आहे.''

# केडीएमसी अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी देखील ऊर्जा संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा

## - अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** ऊर्जेची बचत ही सद्यस्थितीत काळाची गरज बनली असून ऊर्जा संवर्धनासाठी महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी देखील पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी केले. विद्युत विभागामार्फत महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या ऊर्जा संवर्धन सप्ताहाच्या शुभारंभ समयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिकेचे ब्रॅंड ॲम्बेसेडर आणि महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेचे डॉक्टर प्रशांत पाटील, न्यू रोटरी क्लब कल्याणचे बिजू उन्नीथन ,महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

ऊर्जा संवर्धन म्हणजे जबाबदारीने ऊर्जेचा वापर करणे होय. भारतातील ७० टक्के वीज निर्मिती ही कोळशापासून होते आणि आता कोळशाचे आयुष्यमान सर्वत्र कमी होत आहे त्यामुळे पुढील पिढीसाठी हे नैसर्गिक स्त्रोत जतन करावयाचे असतील तर ऊर्जा संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने उचलली पाहिजे , तरी आवश्यकता नसताना विजेचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी यावेळी केले. संपूर्ण देशभरात १४ डिसेंबर हा ऊर्जा संवर्धन दिन तसेच १४ ते २० डिसेंबर या कालावधीत ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या विद्युत विभागाकडूनही दरवर्षी ऊर्जा संवर्धन सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी महापालिका मुख्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करण्यात आली. या ऊर्जा संवर्धन सप्ताहात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विद्युत विभागाकडून तीन आकर्षक माहिती पत्रके तयार करण्यात आली आहेत. यापुढील आठवडाभर देखील विद्युत विभागाकडून कल्याण डोंबिवलीतील विविध सार्वजनिक ठिकाणी आणि गृह संकुलात ऊर्जा संवर्धन आणि बचतीबाबत जनजागृती केली जाणार आहे.

यावेळी विद्युत विभागाबाबत तयार करण्यात आलेल्या आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आणि ऊर्जा बचत आणि संवर्धनाची शपथ महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

# घेसर, निळजे गावातील मेट्रो प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मिळणार योग्य मोबदला

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण लोकसभेचे खासदार श्री श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदइशांनाखाली आणि कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांच्या योग्य पाठपुराव्यामुळे मेट्रो जमीन प्रकल्प बाधित स्थानिक शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी शिवसेनेचे शिष्ठाचार मंडळ सोबत घेऊन राजेश मोरे यांनी लिखित प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे संबंधित विभागाकडे सुपूर्द केला.



विकास कामे होत असताना स्थानिक भूमिपुत्र व शेतकरी यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी आपण नेहमी प्रतन्यशील राहू अशी ग्वाही यासमयी आमदार राजेश मोरे यांनी दिली. याप्रसंगी सुभाष पाटील -विभागप्रमुख (लोढा पलावा )गजानन पाटील -कृषी उत्पन्न बाजार समिती, प्रकाश पाटील -विभाग प्रमुख -निळजेगाव, गिरीधर पाटील -माजी सरपंच, महेश पाटील -शाखा प्रमुख निळजेगाव, अमोल भोगले -उपतालुका प्रमुख तसेच अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

# किसनराव पावडे पाटील मुंबई पालिकेतील शिक्षण विभागात उच्च पदावर



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता निघोज(प्रतिनिधी)**

घरची अत्यंत हालाखीची परिस्थिती , घरात शिक्षणाचे नामोनिशाण नाही , आई, वडील मोलमजुरी करून कुटूंबांचे गुजराण करत , परंतु जिद्दीने पेटून उठलेला एक तरुण , देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पोटापाण्या साठी जातो काय , अन् तुटपुंजी नोकरी करून शिक्षण घेत मुंबई महानगर पालिकेतील शिक्षण विभागात प्रशासकीय अधिकारी म्हणून रूजू होतो , काय . ही कहाणी आहे , पारनेर तालुक्यातील अतिशय छोटे व डोंगराळ गाव असलेले दरोडी येथील किसन बाजीराव पावडे पाटील यांची .

त्यांचे मुळ गाव दरोडी , त्यांचे शिक्षण ही एम . ए . ड इंग्रजी . बी ए बी एड ,एम एड .दरोडीसारख्या अतिशय दुर्गम आणि दुष्काळी भागात जन्म झाला. वडील साधारणपणे ३० वर्षापुर्वी मजुरी आणि सालगडी म्हणून काम करत होते. आई देखील रोजंदारीवर काम करून चार पोरांसह संसाराचा गाडा हाकायला मदत करत असे. किसन ने देखील इयत्ता ९ वी पासुन मोल मजूरी ची कामे करायला सुरुवात केली . मग ती रोजगार हमीची कामे, विहीर खोदण्याची कामे, डोंगरात पाणी आडवा पाणी जिरवा या योजनेंतर्गत खड्डे खोदण्याचे काम, कांद्याच्या गोण्यांची हमाली अशी अनेक कामे करून शिक्षण पुर्ण केले.

शिक्षणाची सुरुवात दरोडी येथील इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत , माध्यमिक शिक्षण दरोडी मधील हनुमान विद्यालयात इयत्ता ८ वी ते १० वी हनुमान विद्यालयात, पुढे अळकुटी मध्ये उच्च माध्यमिक शिक्षण येथील श्री. साईनाथ माध्यमिक विद्यालय , पुढे उच्च शिक्षणासाठी तालुक्याचे गाव असलेले पारनेर येथील पदवीपर्यंत पारनेर महाविद्यालयात पूर्ण केले, त्यानंतर अहिल्यानगर मध्ये उच्च महा विद्यालयात एम ए इंग्रजी पूर्ण केले . त्यानंतर संगमनेर मध्ये शिक्षण शास्त्र महा विद्यालय या ठिकाणी बी एड ची पदवी पूर्ण केली .

सन २००१ साली नोकरी मिळवण्याच्या दृष्टिकोनातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई नगरी मध्ये पदार्पण केले. सुरुवातीला साडेचार वर्षे विक्रोळी च्या पार्क साईट येथील विवेक विद्यालय येथे विनाअनुदानित शाळेवर काम केले . सदर शाळेत काम करत असतानाच खाजगी शिकवणी वर्गा मध्ये इयत्ता दहावी व बारावीला इंग्रजी विषयाचे अध्यापन केले. त्यानंतर नवी मुंबई महानगर पालिकेत २००६ साली इंग्रजी विषयाचा शिक्षक म्हणून नेमणूक झाली.

अडीच वर्षे महानगर पालिकेमध्ये माध्यमिक शिक्षक म्हणून काम केले .

सन २००८ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षण विभागात शिक्षण निरीक्षक या पदाची जाहिरात आल्यानंतर स्पर्धात्मक परीक्षेच्या माध्यमातून वॉक इन सिलेक्शन मध्ये मार्च २००९ मध्ये शिक्षण निरीक्षक या पदावर नेमणूक झाली.

सुरुवातीला विभाग स्तरावर काम करून मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांचे सोबत सचिव म्हणून काम करण्याची संधी मिळाली.

तेव्हापासूनच वक्तृत्व कलेची आवड असल्यामुळे विविध कार्यक्रमांमध्ये निवेदक म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. मुंबईसारख्या ग्लॅमर व झगमगटी असलेल्या मायावी शहरांमध्ये मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री व विविध कॅबिनेट मंत्री यांच्या वेग वेगळया सभां व कार्यक्रमांमध्ये निवेदक म्हणून काम करण्याची नाविन्य व वैविध्य पुर्ण संधी मिळाली. तसेच मुंबई महापालिकेचे महापौरांच्या विविध कार्यक्रमांमध्ये निवेदक म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली . यासोबतच वारकरी संप्रदायाची परंपरा असल्यामुळे विविध ठिकाणी प्रबोधन , प्रवचन व हरि किर्तन करण्याचा देखील योग आला. या धकाधकीच्या जीवनातून वेळ काढून दररोज एक अभंग लिहिण्यास सुरुवात केली. आता पर्यंत अनेक अभंग लिहून सोशल मीडिया च्या माध्यमातून प्रसिद्ध ही झाले आहेत . लवकरच या सर्व अभंगाची एक अभंगवाणी पुस्तिका प्रसिद्ध होणार आहे . २०२१ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिका शिक्षण विभागात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळाली . या माध्यमातून प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही विभागांचा कारभार करण्याची संधी प्राप्त झाली आहे . अतिशय कठीण परिस्थितीतू शिक्षण घेऊन उच्च पदापर्यंत मजल मारता आली.

या निमित्ताने आजच्या तरुणांना ' दैनिक पारनेर समर्थ ' परिवाराच्या वतीने एक संदेश द्यावासा वाटतो , आजचा तरुण पुस्तकी अभ्यास करण्या ऐवजी मोबाईल व टि व्ही त गुंतत चालला आहे , हे जीवन व जीवनात काही तरी करून दाखविण्या ची संधी जी मिळाली आहे , तिचे सोनं करा , अन्यथा वेळ निघून गेल्यावर फक्त पश्चात्ताप करण्याची वेळ येते . अभी नहीं तो , कभी नहीं ।

# टिटवाळयातील समस्या सोडवण्यासाठी १७ डिसेंबर रोजी केडीएमसीसमोर आंदोलन



## माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांचे आयुक्तांना निवेदन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

मांडा टिटवाळा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत वारंवार पत्र देवूनही महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. यासाठी माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांनी महापालिका आयुक्त डॉ इंदुराणी जाखड यांची भेट घेतली व समस्या सांगितल्या. समस्या नाही सोडविल्यास १७ डिसेंबर रोजी महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

मांडा टिटवाळयातील गृह संकुलांना कमी दाबाने पाणी पुरवठा होत असुन पाणी पुरवठा जास्त दाबाने व वेळेवर सोडणे, मोहिली जलशुद्धीकरण केंद्र येथुन मांडा टिटवाळा साठी येणाऱ्या मुख्या पाण्याच्या लाईनवर प्रेशरगेज मशीन बसवणे, अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करावी, काळू नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवणे व गळती थांबविण्यासाठी उपाय योजना करणे, अशा विविध समस्या असुन त्या सोडवण्यासाठी महापालिका प्रशासनाने लक्ष दयावे अन्यथा १७ डिसेंबर रोजी महा पालिका मुख्यालया समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांनी दिला आहे.

# लोकशाहीची पायाभरणी करणाऱ्या वीरांचा उल्हासनगरात सन्मान सोहळा

## उल्हासनगरमध्ये निवडणूक अधिकाऱ्यांचा गौरव

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता उल्हासनगर(प्रतिनिधी) :**

लोकशाहीचा भक्कम आधारस्तंभ असलेल्या निवडणूक प्रक्रियेच्या यशस्वी आयोजनामागे मेहनत करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान हा नेहमीच विशेष क्षण असतो. उल्हासनगर येथे १४१ विधानसभा व लोकसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेत आपले योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा भव्य सन्मान सोहळा सिंधू भवन, सपना गार्डन येथे संपन्न झाला. हा सोहळा त्यांच्या योगदानाला प्रेरणादायी क्षण ठरला.

सिंधू भवन या दिमाखदार स्थळावर आयोजित या कार्यक्रमात २०२४ लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी मेहनत करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी विजयानंद शर्मा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात तहसीलदार कल्याणी कदम यांच्या प्रस्ताविकाने झाले. त्यांनी अधिकाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठेने केलेल्या कामाचे कौतुक करताना त्यांच्या मेहनतीचा आदर व्यक्त केला. निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा यांनी निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. 'ही निवडणूक यशस्वीरीत्या पार पडली, यामागे सर्वांच्या परिश्रमांची मोठी भूमिका आहे. कोणताही अडथळा न येता कार्य पूर्ण होणे ही आपल्या एकत्रित कामगिरीची पावती आहे,' असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा उल्हासनगर महापालिकेतील अधिकारी राजेश घनघाव यांनी उत्तमरित्या सांभाळली. यावेळी लिपिक रमेश अव्हाड यांनी आपल्या सुमधुर गायनाने कार्यक्रमात आनंदाचा रंग भरला. या सोहळ्यात प्रमुख मान्यवरांसह १४१ विधानसभा मतदारसंघातील सर्व नियुक्त अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हा सोहळा निवडणूक प्रक्रियेत योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नव्या जोमाने काम करण्यासाठी प्रेरित करणारा ठरला. लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा पार पाडणाऱ्या या वीरांचा सन्मान हा फक्त त्यांच्याच नव्हे, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेचा सन्मान असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीच्या वतीने

# गोपीनाथ मुंडे यांची ७५ वी जयंती उत्साहात संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीच्या वतीने गोपीनाथ मुंडे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त साई चौक खडकपाडा कल्याण येथे जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या संयोजनची जबाबदारी समितीने निवृत्ती घुगे आणि संग्राम घुगे यांच्यावर सोपविली होती ती त्यांनी उत्कृष्टपणे कार्यक्रमाचे आयोजन करून पार पाडली.

कार्यक्रमाची सुरुवात गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यावर व कर्तुत्वावर तसेच आठवणी वर आधारित गीतांनी गायक रामहरी कुटे यांनी केली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी मुंडे यांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांना अभिवादन केले.

यावेळी पाहुण्यांचे हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त ७५ ज्येष्ठ नागरिकांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास महाराष्ट्र नवनिर्माण सेना कल्याण जिल्हा अध्यक्ष उल्हास भोईर, भारतीय जनता पार्टी पक्षाच्या साधना गायकर , तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते साईनाथ तारे तसेच माजी नगरसेवक सुधीर बासरे असे सर्व पक्षीय नेते पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीचे अध्यक्ष शंकरराव आव्हाड, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर धात्रक, तसेच खजिनदार रामनाथ दौंड, सहखजिनदार भाऊसाहेब आंधळे, आत्माराम फड ,सुभाष घुगे , माधवराव आव्हाड, ॲड. अनिल लाडवंजारी हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीतील युवा सदस्य अनिल दौंड, किरण दराडे, पीयूष काकड, तसेच आकाश घुगे, सचिन दराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवृती घुगे यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड संग्राम घुगे यांनी केले. तसेच नेटके व सुदंर सूत्रसंचालन डॉ विद्या शिर्के यांनी केले .

# सेंट मेरीज स्कूलचा खेळ मेळा उत्साहात साजरा



## केडीएमसी अभियंता रोहिणी लोकरे कोळसेवाडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांची प्रमुख उपस्थिती

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

सेंट मेरी हायस्कूल, कल्याणचा वार्षिक क्रीडा दिन कार्यक्रम, खेल मेळा'२०२४ साजरा करण्यात आला. या भव्य कार्यक्रमाची थीम होती 'युनिव्हर्सल आउटलुक' - ही संकल्पना रुजलेली आहे. चिन्मय व्हिजन कार्यक्रम. चिन्मय व्हिजन स्कूल असल्याने, सेंट मेरी भारतीय परंपरा आणि चालीरीतींवर खूप लक्ष केंद्रित करते.

खेळ मेळा हा दीड महिन्याच्या क्रीडा स्पर्धांचा निकालाचा दिवस असतो, ज्यामध्ये वैयक्तिक खेळ, सांघिक खेळ, आंतर- शालेय स्पर्धा आणि डीएसओ यांचा समावेश आहे.

युनिव्हर्सल आउटलुकची थीम संपूर्ण इव्हेंटमध्ये सुंदरपणे आणली गेली, उत्कृष्ट कामगिरी आणि प्रात्यक्षिकांनी एकाच वेळी सर्वांना मंत्रमुग्ध केले आणि प्रबुद्ध केले.

पारंपरिक शपथविधी, शालेय ध्वजारोहण, एनसीसी कॅडेट्सचा मार्चपास्ट आणि मशाल प्रज्वलित करून, ऑलिम्पिक उद्घाटन कार्यक्रमाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

विद्यार्थ्यांनी विविध ट्रॅक इव्हेंटमध्ये देखील भाग घेतला, प्रत्येक शाळेच्या घरात निरोगी स्पर्धेची हवा होती. सुव्यवस्थित सादरीकरण, तपशीलवार पोशाख आणि विस्तृत कला कृतींनी कॅलिडोस्कोपिक देखावा तयार केला.

सेंट मेरीमध्ये पालकांच्या सहभागाला खूप महत्त्व दिले जाते आणि जेव्हा पालकांनी खेळ आणि शर्यतींमध्येही भाग घेतला तेव्हा हेच दिसून आले.बप्रमुख पाहुण्या रोहिणी लोकरे, बीएसयूपी आणि केडीएमसी येथील पर्यावरण व प्रदूषण नियंत्रण विभाग यांनी खेळाला महत्त्व दिल्याबद्दल व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल शाळेचे कौतुक केले. उच्चशिक्षित प्रमुख अतिथी अशोक कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोळसेवाडी यांनी मत मांडले की खरी शिस्त नेहमीच जमिनीवर शिकली जाते.

आर्य ग्लोबलचे डायरेक्टर भरत मालिका यांनी पालकांच्या उपस्थिती बद्दल त्यांचे आभार मानून , स्कूल टीचर , नॉन टीचींग स्टाफचे हा एक विशेष दिवस बद्दल तोंड भरून कौतुक केले. विद्यार्थ्यांना संबोधताना खेळा मध्ये तुम्हाला उर्ज्या देण्याची ताकद निर्माण करते सांगून उपस्थिती पाहुण्यांचे आभार व्यक्त केले.दीपक वर्मा, क्रीडा संचालक आणि विंदा भुस्कुटे सीईओ, . राधामणी अय्यर प्राचार्य आर्य गुरुकुल, नांदिवली, शीतल सप्रा, लिटल आर्यनच्या केंद्र प्रमुख यांनी त्यांच्या उपस्थितीने दिवसाच्या कार्यक्रमांना उत्साहाने पाठिंबा दिला.

स्पृहा सोमण आणि रुतु किटलेकर आणि सेंट मेरीचे माजी विद्यार्थी ओंकार नन्हे यांनी स्वतःला कसे प्रेरित आणि केंद्रित ठेवावे याविषयी त्यांचे विचार मांडले आणि शाळेच्या क्रीडा इच्छुकांसोबत मौल्यवान इनपुट सामायिक केले. खेळाच्या शेवटी विविध खेळांमध्ये सहभाग घेतलेल्या विजेते विद्यार्थ्यांना मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

# महाराष्ट्रात सातशे अंगणवाडयातून दहा हजार मुलांना रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून शिक्षण

## -आयुक्त कैलाश पगारे



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

मुलांना खेळातून शिक्षण देण्याबरोबरच अंगणवाडी ताईनी त्यांच्या आई होऊन शिक्षण दिले तर या मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होईल, आणि हे काम रिलायन्स फाऊंडेशन च्या माध्यमातून सुरू झाले आहे. महाराष्ट्रात सुमारे ७०० अंगणवाडीतील १० हजार मुलांना असे शिक्षण देण्याच्या या उपक्रमाचे उद्घाटन कल्याण तालुक्यातील रायते येथे झाले असल्याचे एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे यांनी जाहीर केले.

आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, रिलायन्स फाउंडेशन ने कोकण विभागात ठाणे जिल्ह्यात २४अंगणवाडया बांधण्यात आल्या आहेत, याचे प्राथनीधीक उद्घाटन तालुक्यातील रायते येथे शुक्रवारी झाले, या अंगणवाडीत खेळातून शिक्षण, दिले जाणार आहे. ग्रामीण भागात अंगणवाडयाचा प्रश्न गंभीर आहे, तरीही महापोषण मध्ये ठाणे जिल्हाने चांगले काम केले आहे. कुपोषण कमी झाले आहे, गरोदरपणात अंगणवाडी सेविका काळजी घेत असल्याने कुपोषण कमी होत आहे, पण तरीही पहिल्या एका तासात केवळ ६८ टक्केच महिला आपल्या बाळाला दुध पाजतात, हे गंभीर असल्याचे सांगून याकडे शासन विशेष लक्ष देत असल्याचे सांगितले.

यानंतर रायते पिंपळोली ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच समिता सुरोशे या म्हणाल्या,आमच्या गावात अंगणवाडी बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती, मात्र माझी झेडपी सदस्यां जयश्री सासे यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे आज या अंगणवाडया उभ्या राहिल्या आहेत. तर अंगणवाडी सेविका सुंनदा पवार यांनी आपले अनुभव उपस्थितीतां समोर मांडले. जिजाऊ संघटनेच्या अस्मिता शिंगोळो यांनी रिलायन्स फाऊंडेशन ने केलेल्या कामाबद्दल कौतुक केलं. यावेळी रिलायन्स फांऊंडेशन च्या नुपूर बहल यांनी अंगणवाडी केंद्राविषयी माहिती दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर डेप्युटी कमिशनर संगीता लोंढे, ठाणे जिल्हा परिषदेचे बालविकास विभागाचे संजय बागूल, संतोष भोसले, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, सरपंच समिता सुरोशी,

,सहाय्यक बीडिओ आर के गवारी, बालविकास अधिकारी, अर्चना पवार,तसेच या विभागाच्या मुख्य सेविका, विस्तार अधिकारी, रायते शाळेचे एस एस पाटील, अंगणवाडी सेविका,ग्रामसेवक राजा सुरवसे, आदी मंडळी उपस्थित होते.

# शास्तीमाफीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता पनवेल(प्रतिनिधी) :**

: थकीत मालमत्ता कर न भरल्याने पनवेलकरांना महापालिका प्रशासनाने लादलेल्या मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी भारतीय जनता पक्षाने राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात मालमत्ता कराचा मुद्दा गाजला. भाजप नगरसेवकांनीच कर पनवेलकरांवर लादला हे पटविण्यात काहीअंशी विरोधकांना यश मिळाले. परंतु मालमत्ता करापेक्षा सर्वाधिक चर्चा माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या करावरील शास्तीमाफीच्या घोषणेची झाली. आ. प्रशांत ठाकूर यांनी घोषणेपूर्वीच माजी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे शास्तीमाफीसाठी अभय योजना राबविण्याची विनंती केली होती. अजूनही अध्यादेश जाहीर न केल्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा सुरू केल्याची माहिती आ. ठाकूर यांनी दिली.




# दोन वर्षांपूर्वी हरवलेली मूकबधिर तरुणी शोधण्यात पेण पोलिसांना यश

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

शहरातून दोन वर्षांपूर्वी हरविलेल्या तरुणीचा शोध घेण्यात पेण पोलिसांना यश आले आहे. गुजरातमधून तरुणीला ताब्यात घेण्यात आले आहे.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मालता चिंधू साटम (३०) ही तरुणी जन्मजात मुकी आहे. ती दोन वर्षांपूर्वी घरातून अचानक निघून गेल्याने तिची आई वंदना साटम हिने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

पोलिसांनी पेण शहर तसेच आजूबाजूच्या परिसरामध्ये तिचा शोध घेतला मात्र ती कोठेही मिळून आली नाही.



तिच्या उजव्या हातावर तिचा भाउ लक्ष्मण साटम यांचा मोबाईल नंबर गोंदविण्यात आला होता परंतु तो तिच्या हातावर व्यवस्थित उमटलेल्या नसल्याने तिचा शोध लागत नव्हता.आजूबाजूच्या राज्यामध्ये तपास सुरू असताना तब्बल दोन वर्षांनी पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चिंधू गुजरातमध्ये असल्याची माहिती पेण पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शना खाली पेण पोलिसांचे पथक तातडीने चिखली येथे पोचल्यावर सदर

तरुणीला ताब्यात घेतले. त्यानंतर तिच्या नातेवाईकांची ओळख पटवून सुखरुप पालकांच्या ताब्यात दिले.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशान्वये पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सतीश भालचंद्र पाटील, प्रिया पाटील, स्वरा पाटील यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी